
म.
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.क.वा.
दा. क्र. ५४१६



IRBK-0105416
IRBK-0105416

# एकाच ईश्वराची लेकरें

— गोपीनाथ तळवलकर

# सारीं एकाच ईश्वराचीं लेकरें

मराठी ग्रंथ संग्रहालय

लेखक
गोपीनाथ तळवलकर

IRBK-0105416

आनंद
कार्यालय
प्रकाशन

किंमत
१० आणे

प्रकाशक
यशवन्त गो. जोशी, बी. ए.
आनंदकार्यालय
३३० सदाशिव, पुणें २

आवृत्ति पहिली
२५ एप्रिल १९५५
* * *
किंमत दहा आणे

मुद्रक
यशवन्त गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव, पुणें २

अनुक्रम १८८२५०
विभाग ओ : वा
क्रमांक ६६७३
नों. दि. २०।३।५६

## मित्र हो !

आपला देश फार मोठा आहे. त्याच्यामागें मोठा इतिहास आहे. त्यांत अनेक पंथ, धर्म, जाती आहेत. या सर्वांत मेळ घालण्याचा प्रयत्न थोर थोर महात्म्यांनीं केला. राष्ट्रपिता गांधीजींनीं अलीकडल्या काळांत हीच शिकवण दिली. ' सर्वधर्म-समभाव ' ठेवा म्हणजे सर्व धर्मांविषयीं सारखी भक्ति बाळगा असे ते सांगत. सर्व धर्म मुळांत एक आहेत, सारखे आहेत हें कळलें तरच अशी भक्ति ठेवणें सोपें होईल. तेंच या लहानशा पुस्तकांत सोप्या भाषेंत सांगितलें आहे. अभंग व ओव्या तुमच्या ओळखीच्या आहेत. त्यांतले कठीण शब्द तुम्हांला कळतील.

आपल्या देशांतलीं धर्माधर्मांतलीं व जातीजातींतलीं भांडणें आपण मिटविलीं तर दोन गोष्टी होतील. एक, जगाला आपण धडा घालून देऊं. जगांत आपलें वजन वाढेल. दुसरें, आज जी आपली भरमसाट शक्ति वायां जाते ती वांचेल. तिचा चांगल्या कामाकडे उपयोग करतां येईल. वैभव आकाशाला पोंचेल. आपली ही मायभूमि सर्वांत पुढें यावी यासाठीं आपले आवडते पंतप्रधान झटत आहेत. त्यांच्या हाताला यश येईल. हें पुस्तक मन लावून वाचा.

हें पुस्तक लिहिण्याची मुख्य स्फूर्ति ' दादां 'नीं ( यशवंत जोशी ) दिली. माझें पुस्तक तुम्हांला आवडलें तर मनानें त्यांचे आभार माना.

आनंदकार्यालय, पुणें.
२५।४।५५

तुमचा
**गोपीनाथ तळवलकर**

# अनुक्रम


१. एकमेकांचे शेजारी ५
२. नाना आले .... .... ११
३. रहमानची समजावणी १७
४. एका ईश्वराचीं लेकरें २४
५. नवा प्रकाश .... .... ३३


* * *

# एकमेकांचे शेजारी



रायबा मोठा सरळ आणि अश्राप माणूस होता. आपलें काम बरें कीं आपण बरें. झुंजूंमुंजूं झालें कीं उठायचा. कासराभर दिवस येईपर्यंत तो घरांतलें काम करी. घर साफ करणें, गाईची निगा ठेवणें, शेतीचीं अवजारें दुरुस्त करणें हीं कामें चालत. स्वतः तो फारसा शिकलेला नव्हता. पण मुलांनीं शिक्षणांत मागें पडूं नये असें त्याला फार वाटे. म्हणून सकाळीं मुलांना तो जागें करी आणि अभ्यासाला बसवी. मात्र कधीं खेकसायचा नाहीं त्यांच्यावर. "निवृत्ति, उठा बाबा, शाहणं कुणाला व्हायचंय ? शेवंती, चला. भूपाळी म्हणायची ना.... गन्या, आज धडा केला तर एका माणसाला काय देणार आहांत आम्ही ? " अशा गोड शब्दांत रायबा आपल्या लेकरांना उठवायचा.



रायबा माळकरी होता. सकाळचीं कामें चालू असतांच तोंडानें अभंग, भजनें चालूं असायचीं.

धाव पाव सांवळे, विठाबाइ कां मनिं धरली अढी ।
अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी ॥

अशा ओळी रायबाच्या तोंडून बाहेर पडल्या कीं शेजारचे म्हातारे शिदबा जागे होत. खोकल्याची उबळ दाबून रायबाचीं भजनें ऐकत बसत. पण रायबाचें भजनपूजनाचें अवडंबर फार नसे. शेतांत जाण्यापूर्वीं आंघोळ करायची. गोपीचंदनाचा टिळा लावायचा. देवाला दंडवत घालून बाहेर पडायचें. दिवसभर शेतांत खपे तो. संध्याकाळीं परत आल्यावर पाय धुवून परत दंडवत घालायचा. अभंगांचा पाठ मात्र नेहमीं सुरू असे. संसार नीट नेकीनें करावा, लोकांच्या उपयोगीं पडावें, देवाला विसरूं नये, हें रायबाचें पाहणें असे. त्याच्या मनाची शांति कधीं ढळत नसे.

पण आज संध्याकाळीं रायबा घरीं आला तो मात्र भडकलेला दिसला. आज आल्यावर तो नेहमींप्रमाणें गोठ्याकडे गेला नाहीं. पोरांना जवळ घेऊन त्यानें गोंजारलें नाहीं. त्यांच्या अभ्यासाची चौकशी केली नाहीं! त्यानें टोपी आणि कुडतें फेकून दिलें. घराच्या ओट्यावर वाकळ टाकली. आणि वर आकाशाकडे नजर लावून तो बसला. पोरें दारात गप्प उभीं राहून पहात होतीं. गोठ्यांत गाय हंबरूं लागली. रायबाची बायको कौतिक भाकरी करतां करतां उठली. तिनें डोक्यावर झटकन् पदर घेतला आणि ती ओट्यावर आली. भीतभीतच तिनें विचारलें,

" काय झालं आज? बोलत नाहींसा? दुखतंय का? "

कौतिकचें हें विचारणें चाललें असतांच शेजारचे शिदबा खोकत खोकत आले. त्यांनाहि आश्चर्य वाटलें होतें. तेहि म्हणूं लागले,

" रायबा, आज तूं गप्प कसा? मी म्हटलं ' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ । ' अशी कांहीं अभंगवाणी तुझ्या मुखांतून ऐकायला मिळेल. "

" शिद्बा, कांहीं खरं नाहीं हें बघा. नुसतं आम्हीं म्हणायचं ' भेदाभेद भ्रम अमंगळ. ' पण खरी वेळ आली कीं माणसं हें सारं विसरतात. " रायबा अगदीं कडवटपणें म्हणाला. त्याच्या मनांत कुठेंतरी कांहींतरी खुपत होतें. त्याची कपाळावरची शीर तटाटली होती. डोळ्यांत दुःख होतें, राग होता.

शिद्बांना विचित्रच वाटलें सारें. ते म्हणाले, " काय झालं रे रायबा ? तूं अगदीं थंड माथ्याचा गडी. सारे तुला तुकोबाचा अवतार समजतात. मग आजच कां अशी वैतागाची भाषा काढतोस रे ? "

" शिद्बा, तसंच कांहीं झालं म्हणून तर मगज ठिकाणावर राहिला नाहीं. हा मशिदीपलीकडं राहाणारा रहमान तुम्ही ओळखता ना ? "



" हां तो सायकल्-वाला. "

" तो च माझा जिवाचा दोस्त. मागें आपल्या गांवांत हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला तेव्हां माझ्या घरांत याला मी दडवून ठेवला होता. घरांत गोडधोड असलं तर याला दिल्याशिवाय घास गळ्याखालीं उतरत नाहीं माझ्या. तो पण तसा जिवाला जीव देणारा. आमचा धाकटा भाऊ कान्होबा नव्हता का ? "

" हां. तो तिकडे कुठें रावळपिंडी का फिंडीला गेला होता तोच ना? रायबा, लागला का रे पत्ता त्याचा कांहीं ? "

" नाहीं हो शिदबा. देवाघरचं देणं देवानं नेलं ! दुसरं काय?" रायबानें एक निःश्वास सोडला. कांहीं वेळ तो बोलला नाहीं. मग म्हणाला, " हो, तर शिदबा, काय सांगत होतों ? आमच्या कान्होबाला या रहमाननं अंगाखांद्यावर. खेळविलं. त्याच्या घरींच राहायचा म्हणाना तो. रहमाननं फार भर घातली म्हणून तर कान्होबा तिकडे नशीब काढायला गेला."

" आतां काय केलं रहमाननं ? "

" ऐका ना. यंदा ताबूत आणि गणपति एकाच वेळीं आले आहेत. मशिदीसमोरचा गणपति कसा बसतो तो पाहतो असं रहमान म्हणाला. मशिदीवरून वाजंत्रीं वाजूं द्यायचीं नाहींत असें तो म्हणतो. दमदाटी करतो. आज मी माझ्या कानानं ऐकलं."

शिदबांनीं एवढ्यांत विडी शिलगावली होती. राख झटकून ते जरा जोसांतच म्हणाले, " अरे वारे सोकाजीराव, कुणाला दम देतोय् हा ! हें काय पाकिस्तान आहे का? थडगं बांधूं म्हणावं एकेकाचं. दहा वर्षांखालची याद नाहीं वाटतं ? "

" पण शिदबा. हा का उजू रस्ता आहे का ? आपण एकमेकाचे शेजारीं. एका काळींत राबतों, तिचंच अन्न खातों, गुण्यागोविंदानं नांदायचं सोडून एकमेकांचे गळे का कापायचे ? "

" मग रायबा, कुणी सुका दम भरूं लागला तर त्याच्यापुढें लोटांगण का घालायचं ? यांचीं टाळकीं सडकल्याशिवाय कांहीं उपाय नाहीं बघ. तूं आहेस माळकरी. मंबाजीनं झोडलं तरी त्याचं अंग रगडलं तुकोबांनीं. त्यांचाच अवतार ना तूं."

रायबा कांहींच बोलला नाहीं. कौतिक मुकाट्यानें सारें ऐकत होती. ती कांहीं बोलणार तेवढ्यांत शिदबा कांहीं आठवल्यासारखें

करून म्हणाले, " हो ! रायबा एक युगत सुचते. रहमान अन् त्याचे जातभाई यांचा कांटा आपण सहज काढूं. पण तुला तें पटत नसेल तर सरकारांत वर्दी देऊं. फौजदाराचा दंडुका पाहिला कीं सुतासारखे नरम येतील. लागतील आपले पाय धरायला. "

"शिदबा" रायबा हसून म्हणाला, " तुमच्यासारखीं शहाणीं-सुर्तीं माणसं असं कसं म्हणतात हो ! अहो, सरकारला मदत मागणं म्हणजे आपण नालायक आहोंत याची कबुलीच कीं ! आपले तंटे आपणांला कां तोडतां येऊं नयेत ? हिंदु-मुसलमान हा प्रश्न दूरच राहिला. आपल्या हिंदु म्हणविणाऱ्या लोकांत काय कमी भेदाभेद आहेत ? तुमच्या म्हणण्याप्रमाणें टाळकीं तरी सडकायचीं, नाहीं तर सरकारला तरी शरण जायचं. याशिवाय हे भेद मिटवायला कांहीं तिसरा मार्गच नाहीं का ? "

" तूंच एकादा काढलास तर पहा. " असें जरा तुसडेपणानें म्हणत शिदबांनीं विडी फेकून दिली. आतां पुनः कारभारी कांहीं वाद घालीत बसतील अशी कौतिकला भीति पडली. ती म्हणाली, " उठा, रात होयला लागली. भाकर खाऊन घ्या. पोरं ताटकळत बसलीं आहेत. अन् अगुदर गोठ्यांत जा. तुम्ही तिकडं गेला नाहीं म्हणून गोजीनं केव्हांपुन वैरणीला तोंड लाविलं नाहीं. "

तरी रायबा तसाच बसून राहिला.

इतक्यांत. चौकांत थाळी वाजविल्याचा आवाज आला आणि लगेच दवंडीहि ऐकूं यायला लागली.

" ऐका, ऐका, उद्यां संध्याकाळीं बाजार चौकांत प्रसिद्ध लोकसेवक नाना चौधरी यांचें व्याख्यान आहे. ' सारीं एकाच ईश्वराचीं लेकरें ' हा विषय आहे. तेव्हां सर्वांनीं, लहानथोरांनीं, बाया-बाप्यांनीं, हिंदु-मुसलमानांनीं, व्याख्यानाला यावं होऽऽऽ"

दवंडी ऐकतांच रायबा एकदम उठला. त्याच्या चेहऱ्यावर


हुशारी दिसूं लागली. तो एकदम म्हणाला, "वाः छान झालं. नाना आले आहेत कां ? देवानंच गाऱ्हाणं ऐकलं.

गजेन्द्राचिच्या आकांतासी । कैसा पावला ऋषीकेशी ।
प्रल्हादाचिया भावार्थासी । स्तंभांतूनि प्रकटला ॥

असें म्हणत त्यानें वाकळ गोळा केली. हातपाय धुतले. देवाला दंडवत घातला. मुलांना मोठ्या प्रेमानें पानावर बसविलें आणि तो म्हणाला,

" थांबा अं. गोजीला भेटून येतो. गोजे आलों ग माये, रागावूं नको. "

रायबानें गोजीच्या पाठीवरून हात फिरविला. तिला थापटलें थोपटलें. तेव्हां तिनें चाऱ्याला तोंड लावलें. मग रायबानें येऊन मुलाबरोबर जेवण केलें. उद्यां सकाळीं नानांना भेटून काय सांगायचें याचा विचार करीत तो झोपी गेला.



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# नाना आले


नाना चौधरी गांवांत आले म्हणजे माणसांचा ताफा भोंवतीं पडायचाच. आज सकाळीं ओसरीवर ते आले तेव्हां पांचपंचवीस लोक येऊन बसले होते. त्यांत दोन तीन सरकारी अधिकारी होते. कांहीं समाजसेवक होते; बोहऱ्यांचे पुढारी सालेभाई, शाळा मास्तर कुलकर्णी, भगिनी मंडळाच्या मुख्य दयाबाई अशीं वेगवेगळ्या थरांतलीं, निरनिराळ्या जातींचीं माणसें त्या ताफ्यांत होतीं.



नानांनीं येतांच सर्वांना नमस्कार केला. कुणीतरी दोघे लांब कोपऱ्यांत होते. त्यांच्या डोक्याला चिंधूक आणि अंगावर कांबळें होतें. त्यांचे चेहरे उन्हानें अगदीं रापलेले दिसले. नानांनीं त्यांना हाक मारली, "अरे रायनाक, ए सत्तू, या ना इकडे बैठकीवर." पण तेवढ्यानें ते ऐके-नात. तेव्हां नानांनीं त्यांना हात धरून चार लोकांच्या मध्यभागीं बैठकीवर घेतलें. एकदोघांचे चेहरे आंबट

झालेले दिसले! चिंतूभटजी तर नाकतोड्याप्रमाणें टुणकन् उडी मारून कोपऱ्यात जाऊन बसले!

तेवढ्यांत खाड् खाड् बूट वाजवीत फादर पिंटो आंत आला. लाल गाजरासारखा रंग; पांढरा शुभ्र पोषाख; गळ्यांत चकचकीत क्रॉस घातलेला. डोळ्यांना सोनेरी चौकटीचा चष्मा; दाढी मिशा करड्या; असा तो सहा फूट उंचीचा गोरा पाद्री मोठा रुबाबदार दिसे.



"या पिंटोसाहेब" नानांनीं त्याचा हात हातांत घेत म्हटलें. पिंटो थंड चेहऱ्यानें म्हणाला, "गुड-मॉर्निंग, णाणाजी. टुमि लोकांनीं आम्हांला या देशांतून हाकलून देण्याचं ठरविलं आहे."

"कुणीं सांगितलं हें तुम्हांला पिंटोसाहेब?"

"सांगायला कशाला पाहिजे? आमचा छळ होतो. आमाला मटलबी, ढोंगी म्हणतात. प्रभु येशूला बदनाम करतात टूमचे लोक."

"पिंटो साहेब," नाना सावकाश बोलूं लागले. "हा

आमचा देश उदार आहे. सोशिक आहे. आम्ही कुठल्याहि धर्मांतल्या साधुपुरुषाला मानच देतो. राष्ट्रपिता गांधीजी तुमच्या येशूला किती मानत तें ठाऊक आहे ना तुम्हांला ? स्वामी विवेकानंदांनीं येशूच्या उपदेशाची स्तुति केली आहे.

विभूतियुक्त जी वस्तु लक्ष्मीवंत उदात्त वा ।
माझ्याचि किरणांतूनि निघाली जाण ती असे ॥

अशी आमची ' गीताई ' सांगते. म्हणून आम्ही येशूला देवच मानतों. माणसांचं पाप नाहींसं व्हावं म्हणून येशूनं स्वतःचे प्राण दिले. अशा महात्म्याला कोण पूज्य मानणार नाहीं ? "

" पण आमाला धोंडे बसतात ना ! आम्ही टुमच्यांतल्या गरिबांची सेवा करतों, त्यांना औषधें देतों, शिकवतों, टरी टुमचे लोक आम्हांला त्रास देतात. "

" पिंटोसाहेब, या देशाला इंग्रजांनीं पिळून काढलं. त्या इंग्रजांचे तुम्ही जातवाले. म्हणून तुमच्यावर इथल्या लोकांचा राग इतकंच. लोकांना असं वाटतं कीं इंग्रजी राज्य गेलं तरी तुम्ही त्या राज्याचे पाईक इथें राहत आहां. पुनः तें राज्य आणण्याची तुमची खटपट चालू आहे, असा कांहीं लोकांना वहीम येतो. बाकी तुमचं गोरगरिबांच्या सेवेचं कार्य फार थोर यांत शंका नाहीं. पण त्यांतहि आपल्या कळपांत लोकांना ओढण्याचा डाव कित्येकांना दिसतो. "

" नॉन्सेन्स " एका तळहातावर मूठ आपटीत पिंटो रागानें म्हणाला.

" शांत व्हा साहेब. हे सर्व गैरसमज दूर करणं तुमच्या हातांत आहे. थोडा वेळ लागेल. आमचा धर्म कुठचाहि असो. देश एक आहे म्हणून आमच्या देशाशीं एकजीव व्हा. लोक तुमच्या पायाशीं येतील. पारशांचा इतिहास माहीत आहे ना तुम्हांला ? "

पिंटो गप्प होता. पण कांहीं माणसें ' सांगा, सांगा ' असे म्हणूं लागलीं. नानांची बैठक म्हणजे ज्ञानाची पाणपोई. घटकाभर त्यांच्याजवळ बसलें तरी किती माहिती व्हायची. नाना सांगूं लागले,

" सहा सातशें वर्षांपूर्वी पारशी लोक इराणांतून इथें आले. मुसलमानांच्या छळामुळें तेथें त्यांना राहणं अशक्य झालं. आपला पवित्र अग्नि त्यांनीं जहाजांत बरोबर घेतला आणि संजाण बंदर गांठलं. आज इतकीं वर्षं ती जमात सुखासमाधानानं या देशांत नांदते आहे. ते आपला धर्म पाळूं शकतात. व्यापार, विद्या, कला यांत त्यांनीं भर घातली आहे. लोकांसाठीं शाळा कॉलेजें, इस्पितळें, कारखाने काढले. आपल्या भारताला स्वराज्याचा संदेश देणारे दादाभाई नौरोजी हे पारशी होते. फेरोजशहा मेथा, टाटा, वाडिया किती नांवं सांगावीं ! थोर थोर पारशी मंडळींनीं या देशाचं वैभव वाढविलं. पिंटो साहेब, आमच्या ख्रिस्ती बांधवांनीं हें उदाहरण गिरवावं. "



यावर पिंटो कांहीं बोलणार होता. पण इतक्यांत रायबा आला. तेव्हां नाना हसत म्हणाले, " या तुकोबाराय, पण काय रे रायबा, मुद्रा नेहमींसारखी प्रसन्न नाहीं दिसत तुझी ! "

रायबा हसला आणि एका बाजूला जाऊन बसला. त्यानें मुद्रेनेंच सुचविलें कीं, खास तुमच्याशीं मला कांहीं बोलायचें आहे. नानाहि उमगले. मग इतरांशीं ते बोलूं लागले. दयाबाईंनीं आपल्या भगिनी मंडळाची माहिती सांगितली आणि नानांनीं मंडळाला भेट द्यावी अशी विनंति केली.

" दयाबाई, तुमच्या मंडळांत सर्व जातींतल्या स्त्रिया येतात का ? "

" नाहीं; हिंदु तेवढ्या येतात. "

" बरं. त्यांत मागासलेल्या जातींच्या किती असतात ? "

" फार थोड्या. बहुतेक पांढरपेशा वर्गाचाच भरणा असतो."

" असं का ? तुम्ही घरोघर जा. मागासलेल्या समाजांत फिरा. महारवाड्यांत हिंडा. आपल्यांत या दऱ्या नकोत. त्या बुजविल्या तरच इतरांना उपदेश करण्याचा अधिकार आपणांस येईल. तुमच्या भगिनी मंडळाची अध्यक्ष हिंदु आहे, पाहुण्याची ओळख ख्रिस्ती बाई करून देत आहे, आणि शेवटीं आभार मुसलमान स्त्री मानीत आहे, असा सुंदर देखावा निर्माण झाला पाहिजे. तो होईल तेव्हांच तुमच्या समाजांत मी येईन. परवांची गोष्ट; जगन्नाथपुरीच्या देवळांत विनोबा जाऊं लागले. बरोबर ख्रिस्ती माणूस होता. पुजारी त्याला येऊं देईनात. म्हणून विनोबाजी आंत न जातां तसेच परत फिरले. वाचलंत ना ? ही वृत्ति प्रत्येकाच्या अंगीं बाणली पाहिजे. "

दयाबाई कांहीं बोलल्या नाहींत. पुढ्यांत ठेवलेलें पाकीट त्यांनीं गळ्यांत अडकाविलें. ‘ बराय् येतें. ’ म्हणून नानांना नमस्कार केला. पायांत चपला सरकावून फणकाऱ्यानें त्या निघून गेल्या ! मग इतर मंडळी हळूं हळूं पुढें सरकली. सर्वांचींच कामें होतीं असें नाहीं. नाना गांवांत आले कीं एकदां त्यांना भेटायचें

एवढेंच पुष्कळांचें ठरलेलें असे. असेच त्या ताफ्यांत पुष्कळ होते.

नानांशीं हजेरी लावून एकेक हळूहळू घरोघर गेला. शेवटीं रायबा तेवढा एकटा राहिला. नाना हसत त्याला म्हणाले, " काय म्हणतात संतमंडळी ? "

" वाः नाना. तुम्ही पण गरिबाची चेष्टा करायला लागला होय ? अहो कसले संत अन् कसलं काय? संत असतों तर तुम्हांला सांकडें घालायला कशापायीं आलों असतों ! कालपासून डोकं नुसतं पिसून गेलं आहे. "

" असं झालं तरी काय ? " नानांनीं गंभीरपणें प्रश्न केला. रायबानें रहमानचें सर्व प्रकरण सांगितलें. नाना विचारांत पडले. गांवांतले मुसलमान तसे मनमिळाऊ होते. पण आढींतला एक आंबा कुजला की सारी आढी नासते ना ? एक रहमान साऱ्या मुसलमानांचीं माथीं भडकविणार नाहीं कशावरून ?

कांहीं वेळ कोणीच बोललें नाहीं. नंतर नाना म्हणाले, " आपण असं करूं, दुपारीं रहमानलाच गांठूं. " " पण नाना, तो वारा प्यालेला वासरागत भडकलाय्, कांहींच्या कांहीं उत्तरं द्यायचा. तुमच्यासारख्या साधुपुरुषाचा अपमानसुद्धां करायचा. "

" करूं दे रे. तो काय आपणांला खातोय् ! ये तूं जेवण करून. मी रहमानला निरोप पाठवतों. " रायबानें नानांना ' हो ' म्हटलें. पण रहमान कांहीं ऐकेल असा भरवसा त्याला मुळींच वाटत नव्हता.



## रहमानची समजावणी : ३ :

नाना आणि रायबा आले, तेव्हां रहमान नुकताच रोटी खाऊन दुकानांत आला होता. तोंडांत पट्टी होतीच. त्याचें एक चवदा पंधरा वर्षांचें पोर पाण्याच्या बादलींत ट्यूब धरून बसलें होतें. समोर हॉटेल होतें. तेथें एक फरमास लावणी लागली होती. रहमानची नजर चुकवून तें पोर गाण्याला हातानें ताल देत होतें. रहमान आंत शिरतांच समोरचा पानपट्टीवाला हसून म्हणाला, " रहमानभाई, आज इतकी जलदी केली ? नेहमीं चारच्या आधीं उगवत नाहीं तुम्ही. "

" अरे बाबा, आज नानाजींचा निरोप आला. ते रायबाला घेऊन येणार आहेत....ओहो आलेच हे. "

" आइये, आइये " म्हणत रहमाननें त्यांचें स्वागत केलें. दुकानांत अडगळ किती होती, विचारूं नका ! रहमाननें ती जरा बाजूला केली. एक चटई अंथरली. रायबा आणि नाना यांना चटईवर बसाविलें. मग त्या पोराच्या कानांत रहमाननें कांहीं सांगितलें. त्याबरोबर बादली बाजूला सरकवून तें पोरगें समोरच्या हॉटेलांत शिरलें.

" काय नानाजी, आज कां येणं केलं ? "

" रहमान, तुझ्या या मित्राला विचार. "

" तो तर बोलायला तयार नाहीं, नानाजी. पहा कसा घुम्यासारखा बसलाय्. "

रायबा या शब्दांनीं खवळला. तो एकदम म्हणाला, " रहमान, बोलण्यासारखं ठेवलं आहेस काय तूं ? आपण आजवर

सख्ख्या भावासारखे वागलों. आतां मोरया नि ताबूत एकदम आले. तेव्हां तुझं डोस्कं फिरलं. तूं गांवांत दम भरीत हिंडतोस. मुडदे पाडायची भाषा बोलतोस. काय बोलायचें तुझ्याशीं ? ”



रहमान गप्प बसला. इतक्यांत एक जाड पेहेलवानी पेशाचा माणूस एका हातांत केटली घेऊन आला. दुसऱ्या हातांतल्या तीन बोटांत तीन कपांचे कान अडकविलेले व बशा धरलेल्या. त्याला पाहून रहमान म्हणाला, “ तुम्ही स्वतःच चहा घेऊन आलां हिंदुराव. पोराबरोबर धाडावा कीं नाहीं ! ”

“ नेहमीं पोराबरोबर धाडतोंच, रहमानभाई. पण नानाजी आल्याचं कळलं. म्हणून स्वतः आलों. साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा ॥ ”

नाना हसले. हिंदुरावना त्यांनीं जवळ बसवून घेतलें. चहा-पान सुरू झालें. नाना बोलूं लागले,

" रहमान, देशाला स्वातंत्र्य मिळतांना काय ज्या कडवट गोष्टी झाल्या त्या विसरून जा. द्वेषानं द्वेष वाढतो. ' तलवार चालवितील ते तलवारीनेंच मरतील ' असें भगवान् येशू म्हणाला. तें खोटं नाहीं. कारण एकदां तलवार चालविण्याची चटक लागली कीं माणसं आपपर भेद पहात नाहींत. परधर्मी किंवा परकी लोक कापायला मिळाले नाहींत कीं माणसं आपल्या बांधवांकडे वळतात. ' क्रोधाला प्रेमानें जिंका ' असं बुद्धदेवानं सांगितलं. ' चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ' असं आपले संत म्हणतात. हें जाणूनच बापूजी आणि पंडितजी यांनीं या देशांतली हिंसा आवरून धरली. ज्या देशांतल्या पुढाऱ्यांनीं तें केलं नाहीं तिथं काय होत आहे हें आपण वाचतोंच. "

" नाना, " रायबा कडवट आवाजांत म्हणाला, " तुमचं हें सांगणं ठीक आहे. पण या मियाभाईंचं सारं उलटं असतं. कापाकापी हेंच यांच्या धर्माचं ब्रीद. "

" खरं का रे रहमान ? "

" हां. आम्ही मुसलमान चाकू चालवायला मागेंपुढें पाह्यचे नाहीं. मरणाची आम्ही फिकीर बाळगत नाहीं. "

" रहमान, सर्वच धर्मांत निर्भयतेला फार महत्त्व दिलं आहे. ' हरिनो मारग छे शूरांनो ' देवाचा मार्ग हा शूर लोकांसाठीं आहे. पण तुला स्वतःच्याच धर्माच्या खऱ्या स्वरूपाची ओळख नाहीं. मग रायबानं तुम्हा लोकांबद्दल विपरीत बोलावं यांत नवल काय ? "

नानांनीं चहाचा शेवटचा घोट घेतला. खादीच्या रुमालानें तोंड पुसून ते बोलूं लागले, " ऐक रहमान, ऐका हिंदुराव, रायबा. आपण एका देशांत रहात असलों तरी परस्परांची फार थोडी माहिती असते आपणांला. इस्लाम धर्म अरबस्तानांत १३०० वर्षांपूर्वी

महंमद पैगंबरानें स्थापन केला. 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ शांतता असा आहे. महंमद पैगंबराची शिकवण शांततेची होती, बंधुभावाची होती. तो अतिशय नम्र मनुष्य होता. आपलीं कामें आपण करी. मजुराबरोबर त्यानं दगड वाहिले. जेवायला बसला आणि त्याच वेळीं कुणी दाराशीं भुकेला माणूस आला तर महंमद त्याच्यापुढें ताट सरकवी आणि आपण पाणी पिऊन दिवस काढी. अशा रीतीनें त्याला महिना महिना उपास पडत."

"नाना, महंमदसाहेबांचं हें वर्णन रास्त आहे. पण हे सर्व मुसलमान लोकांशीं वागतांना. काफर लोकांना पैगंबरसाहेब कर्दन-काळ होते." रहमान आवेशानें म्हणाला.

"रहमान, तुला कांहीं माहित नाहीं. काफर म्हणजे दुसऱ्या धर्माचे ना? मदिनेंत यहुदी धर्माचे लोक रहात होते. त्यांची कबुली असल्याशिवाय मी शहराचा अध्यक्ष होणार नाहीं असं महंमदानें सांगितलें. 'इतर धर्माच्या लोकांना मान द्या' असंच त्याचं सांगणं होतं. त्याच्या मुलीवर वार करणारा खुनी इसम पुढें आला आणि रडत-कांपत महंमदाची क्षमा मागूं लागला. तेव्हां महंमद म्हणाला, 'अरे, तूं इथें यायला निघालास त्याच्या पूर्वींच तुला क्षमा केली आहे.' हिंदुराव, माणसं जोडावीं कशीं हें महंमदापासून शिकावं. दोनतीन गोष्टी तुम्ही ऐकल्या तर खूष होऊन जाल."

हिंदुराव मांडा ठोकून बसले. आणखी कांहीं माणसें नानांना पाहून तेथें आलीं. त्या लहानशा दुकानांत जागा ती किती असणार! कुणी फळीवर चढून बसले. कुणी तर रस्त्यावरच उन्हांत उभे राहिले!

नाना सांगूं लागले, "अरब लोक मोठे भांडखोर. त्यांच्या लढाऊ टोळ्या असायच्या. प्रत्येक टोळीच्या मोहोरक्याला आपण सर्वांत मोठें आहोंत असें वाटे. एकदां काय झालं? एक दगड मशिदींत नेऊन बसवायचा होता. तो स्वर्गांतून पडला अशी श्रद्धा

होती. म्हणून तो पवित्र पाषाण आपण नेणार असें चार टोळ्यांचे चार मोहोरके म्हणूं लागले. रासवट माणसं तीं. कुणाची समजूत पडणें शक्य नव्हतें. जो तो मोठा तालेवार अन् अडमुठा! हातघाईची वेळ आली! खून पडणार अशीं चिन्हं दिसूं लागलीं. शेवटीं अशी तडजोड ठरली कीं शुक्रवारीं भल्या पहाटे पहिल्यानें जो मनुष्य तिथें येईल त्यानं तो पाषाण न्यायचा. देवाची कृपा अशी कीं महंमदच त्या दिवशीं पहिल्यानें आला."

"मग त्यानंच तो पाषाण नेला असेल?"

"नाहीं. तीच तर महत्त्वाची गोष्ट. तडजोडींत ठरल्याप्रमाणें महंमदाचाच हक्क होता. पण उदार महंमदानें काय केलें? आपलें उपरणें जमिनीवर अंथरलें. त्यावर तो पाषाण ठेवला. चार टोळ्यांच्या चार मोहोरक्यांना बोलावलें आणि उपरण्याचें एकेक टोक एकेकाला धरायला सांगितलें. मग चौघांनीं मिळून तो पाषाण मशिदींत नेऊन ठेवला. जो तो महंमदाची स्तुति करूं लागला.

"असे शेकडो लोक त्यानं जोडले. शत्रूला तो प्रेमानं जिंकी. डरथूर म्हणून महंमदाचा एक कट्टा शत्रु होता. एकदां त्याची व महंमदाची झटापट झाली. पहिल्यानें महंमदाला डरथुरनं पाडलं. त्याच्या छातीवर बसून डरथुर म्हणाला, 'बोल, तुला आतां कोण मदत करणार आहे?' महंमद शांतपणें म्हणाला, "परमेश्वर." डरथुर गडबडला. तेवढ्यांत महंमदानें स्वतःला सोडवलें आणि डरथुरला खालीं पाडलें. तोच प्रश्न त्यानें डरथुरला केला, "तुला आतां कोण मदत करणार?" डरथुर रडूं लागला आणि म्हणाला, "कोणी नाहीं." महंमदानें तरवार फेकून दिली आणि डरथुरला उठवून तो म्हणाला, "का रे? मी आहे कीं!" डरथुर महंमदाचा सच्चा चेला बनला."

गोष्टी रंगत चालल्या होत्या. नानांनीं आणखीहि बोलत

राहावें असें ज्याला त्याला वाटत होतें. रहमान एक शब्द न बोलतां खालीं मान घालून बसला होता. पण नानांना काम होतें. म्हणून ते उठले. रहमानच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, " रहमान, त्या नम्र, मनमिळाऊ, पैगंबराच्या धर्माचा पाईक तूं. इस्लाम म्हणजे शांतता. आपल्या पैगंबराची शिकवण विसरूं नको. "

रहमान यावर कांहीं बोलणार तोंच पोस्टाचा शिपाई आला. ' रहमानभाई, तुझी तार आहे. ' रहमाननें तार घेतली. नानांनीं ती वाचली. ते म्हणाले, " अबदुलची तार आहे ही. पांचच्या गाडीला तुला स्टेशनावर बोलावलं आहे. "

रहमान चकितच झाला !

नानांनीं त्याला कांहीं विचारलें नाहीं. त्यांनीं सर्वांचा निरोप घेतला आणि ते रायबाला घेऊन परत फिरले. रायबा वाटेनें म्हणाला, " नाना, महंमदाचं चरित्र तुम्हीं सांगितलं तें पटलं आपणांला. पण हे मियाभाई असे साव कुठें आहेत ? "

" रायबा, आपल्या धर्मपुरुषांची खरी शिकवण काय याचा फार थोड्यांना पत्ता असतो. तसं पाहिलं तर साऱ्या धर्मांचे मूळ पुरुष एकसारखींच तत्त्वं सांगतात. ज्या लोकांना तीं सांगायचीं त्यांची कुवत जशी असेल तसं त्यांचं सांगणं थोडं बदलतं. त्यामुळें धर्म वेगवेगळे आहेत असा भास होतो. "

" हें नाहीं आलं ध्यानीं. "

" असं पहा. एकच गोष्ट तूं निवृत्तीला सांगशील तशीच शेवंतीला सांगतील का ? नाहीं. वेगळ्या पद्धतीनं सांगशील. कारण दोघांच्या समजुतींत फरक आहे. ज्ञानदेवाला अगदींच सोप्या शब्दांत सांगावी लागेल. तो सर्वांत लहान. हाच दाखला लक्षांत घे. मूळ धर्मतत्त्वं एकच. पण महंमदानं तीं अरबांना सांगितलीं.

तेव्हां अरब जमात अगदींच रानटी होती. त्याच्यापूर्वी सहाशें वर्षं येशूनं ख्रिस्ती लोकांना तीं शिकविलीं. अरबांच्या मानानें ते लोक सुधारलेले. आपल्याकडेच पहाना. प्राचीन ऋषींनीं धर्माचा उपदेश केला तो कठीण शब्दांत. पण बहुजनसमाजाला तेंच संतांनीं किती साध्या भाषेंत सांगितलें. मार्ग अनेक, पण ते जायचे एकाच ठिकाणीं. ओहळ पुष्कळ पण ते मिळायचे एकाच समुद्राला. झाडाचीं पानं शेकडों, मूळ झाड एक."

रायबाच्या डोक्यांत थोडा प्रकाश पडला. तो सावकाश चालला होता. नानांच्या सांगण्यावर विचार करीत होता. त्याचा उजवा डोळा लवूं लागला. हा कसला शुभ शकुन आहे त्याला कळेना !

मराठी ग्रंथ संग्रह
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## एका ईश्वराचीं लेकरें : ४ :

नानांचें व्याख्यान होतें संध्याकाळीं. पण उन्हें कलल्यापासून बाजार चौकांत गर्दी जमूं लागली. माणसें जमावानें येत होतीं. कोस दोनकोसांवरल्या साऱ्या वाड्यांतहि वर्दी पोचली असावी. कारण गांवांत आठवड्याच्या बाजारांत किंवा उरसांत दिसणारे चेहरे आज तेथें दिसूं लागले.

सभेला बायाहि पुष्कळ येत होत्या. नाना जेथून बोलणार होते त्या उंच जागेवर तबला, डग्गा होता. एक गवईबुवा तंबोरा लावीत बसले होते. बुवांचा तो गणपतीसारखा आकार, ते गरगरीत डोळे, त्या लांब जटा, ती भगवी कफनी. सारेंच पाहण्यासारखें होतें. मधूनच आवाज लावण्यासाठीं ते "आंऽऽ ऊंऽऽ" करीत. चढ्या आवाजांत तान मारीत. मग हळूच तंबोऱ्याचा कान पिळीत. त्यावेळीं त्यांचे



डोळे जवळजवळ मिटलेले दिसत. मधून ते तबलेवाल्याला कांहीं सूचना देत. तो पितळी हातोडीनें तबल्यावर कांहीं ठाकठोक करी.

लोकांना अचंबा वाटत होता. कुणी विचारी, "नाना आज व्याख्यान देणार आहेत कीं कीर्तन करणार आहेत?" कांहीं पोरें गवई-बुवांच्या जवळ येऊन गर्दी करीत. तबल्यालाच हळूच हात लावून पहात. स्वयंसेवक त्यांना हुसकावून द्यायचे. आपल्या ओळखीचीं माणसें आलीं कीं त्यांना पुढें घ्यायची ज्याची त्याची धडपड असे.

'या म्हादबा इकडे' 'ए शिवराम, गंगे, मागें काय बसलांत? पुढें या ना!' 'बसा हो राव' अशा आरोळ्या सुरू होत्या. त्यांत दोन बैलच मुसंडी मारून आंत घुसले! कोण धांवपळ झाली विचारूं नका! इतक्यांत नानांची तेजस्वी खादी-धारी मूर्ति दिसूं लागली. मग मात्र शांतता झाली. डोळ्यांत प्राण आणून नानांच्या भाषणाकडे जो तो लक्ष लावून बसला.

रघुपति राघव राजाराम।
पतित पावन सीताराम॥

असें भजन प्रथम थोडा वेळ झालें. नंतर गवईबुवा गाऊं लागले—

वेढून टाकताहे। औदास्य भोंवतालीं।
घर दूर राहिलेलें। घनघोर रात्र काळी॥
तेजोनिधे! दयाळा!। दाखीव मार्ग मातें।
जावोत ना पदें हीं। सोडून सत्पथातें॥
मी दूरचींच दृश्यें। पाहावया न वांछी।
भूमी पुरें दिसाया। एकाच पावलाची॥

गाणें संपलें. गाणें होईपर्यंत नाना स्वस्थ डोळे मिटून बसले होते. नंतर त्यांनीं डोळे उघडले. आणि भाषणास सुरुवात केली.

"भावांनो आणि बहिणींनो! आतां आपल्या बुवांनीं एक गोड पद म्हटलं. तें एका ख्रिस्ती संतानं रचलं आहे. मला वाटतं

आपल्यापैकीं प्रत्येकाला त्यांतला अर्थ कळला असेल. त्या पदांत वर्णन केल्यासारखी आपली अवस्था झाली आहे. जगाची तशीच स्थिति आहे. अंधार वाढत आहे, द्वेष, हिंसा बळावत आहे. हें सगळं नाहींसं करणं आपल्या हातांत आहे. देवाला मार्ग दाखविण्याविषयीं आळवलें. पण पाउलं आपणच टाकायचीं आहेत. एकाच पावलाची जागा दिसली तरी पुरे. याचा अर्थ काय ? उगीच साऱ्या जगाला गवसणी घालण्याची भाषा नको. लांब भविष्यकाळचा विचार नको. आज आपलं घर, आपलं गांव एवढेंच पाहूं. या ठिकाणीं द्वेषाचं, लोभाचं, दुष्ट विचाराचं तण वाढूं देणार नाहीं, एवढा निश्चय आपण केला तरी पुरे आहे.

" पण त्यासाठीं पहिल्यानं काय व्हायला पाहिजे ? आपण सर्व एकाच ईश्वराचीं लेकरं आहोंत हें पटवून घेतलं पाहिजे. आपला हा भारत देश अफाट आहे, हजारों वर्षांचा इतिहास यामागें आहे. या ठिकाणीं पांच हजार वर्षांपूर्वीं आर्य लोक आले, ग्रीक आले, मुसलमान येऊन राहिले. पारशांनीं आसरा घेतला, ख्रिस्ती लोक आले. या उदार देशानं सर्वांना पोटाशीं घेतलं. मारामाऱ्या झाल्या नाहींत असं नाहीं. पण आमच्या ऋषिमुनींनीं, साधुसंतांनीं आम्हांला सहिष्णुतेची शिकवण दिली आहे. ती मधून मधून आम्ही विसरतों. परधर्मी लोकांशीं व आमच्यांत सुद्धां जे पंथ आहेत त्यांच्याशीं आम्ही भांडतों. हें ठीक नाहीं.

" साऱ्या धर्मांचं मूळ एक आहे. ' दया धरमका मूल है. ' दुसऱ्याचं दुःख जाणणं हेंच साऱ्या धर्मांचं मुख्य तत्त्व. एक सूर्य साऱ्या जगाला प्रकाश देतो, एक चंद्र सर्व दुनियेला रिझवतो, एकाच आकाशाची त्रिखंडावर सावली आहे. तसं एकच ईश्वर आपल्या सर्वांचा पिता आहे. ज्यांनीं ज्यांनीं मोठे धर्म स्थापन केले त्यांना हेंच पटलें. हे थोर धर्मसंस्थापक रानावनांत हिंडले. सूर्य,

चंद्र, आकाश त्यांना सतत दिसत होतं. आपले ऋषिमुनि अरण्यांत राहिले. सूर्य, अग्नि, चंद्र, आकाश हींच त्यांनीं देवांचीं रूपं ठरविलीं. पारशांचा मूळ पुरुष झरतुष्ट्र त्यानं हेंच केलं. येशू गोठ्यांत जन्मला आणि पठारावर, नदीकांठीं हिंडत राहिला. पर्वतावर जाऊन त्यानं उपदेश केला. महंमद रात्रीं उंटावर पडून वर आकाशाकडे तासन् तास बघत रहायचा. बुद्धदेव माणसाच्या वस्तीपासून दूर एका झाडाखालीं बसला. महावीरानं तोच मार्ग पत्करला. आमचे तुकोबाराय काय म्हणतात—" नानांनीं बुवांना खूण केली. बुवा गाऊं लागले—



वृक्षवल्ली आम्हा ।
सोयरीं वनचरें ।
पक्षीही सुस्वरें ।
आळविती ।
तेणें सुखें रुचे ।
एकांताचा वास ।
नाहीं गुणदोष ।
अंगा येत ।
आकाश मंडप ।
पृथिवी आसन ।
रमे तेथें मन । क्रीडा करी ।
कंथा कमंडलु । देह उपचारा । जागवितो वारा । अवसरूं ।
हरिकथा भोजन । आवडी विस्तार । करूनि प्रकार । सेवूं रुचि ।
तुका म्हणे होय । मनाशीं संवाद । आपलाचि वाद । आपणासी ॥

नाना सांगूं लागले, "अशा तऱ्हेनें सर्व धर्मपुरुषांनीं धरतीमातेच्या मांडीवर खेळतां खेळतां धर्माचं ज्ञानं मिळविलं. पण जेव्हां धर्म कोंदट घरांत घुसले, चार भिंतींत शिरले तेव्हां त्यांत घाण

माजली. भेद माजले. म्हणून मित्रांनो, जरा आपल्या घराबाहेर पहा. मग तुम्हांला दिसेल सारं एकच आहे. सर्व धर्मांतल्या संतांनीं आणखी एक गोष्ट सांगितली आहे ती लक्षांत घ्या. आज माणसं माणसाला कां भितात? राष्ट्रं राष्ट्रांवर कां तुटून पडतात? एकापेक्षां एक जलाल शस्त्रं कां निर्माण होतात? सर्वांचं कारण एकच. तें म्हणजे संचय, साठा. एकाजवळ पुष्कळ धनदौलत असते, सत्ता असते. ती दुसऱ्याला पाहिजे असते. एकीकडे धान्याचीं कोठारं भरलेलीं. दुसरीकडे माणसं उपाशी मरताहेत. गरजेपेक्षां जास्त साठवायचं नाहीं असं माणसांनीं ठरविलं तर हें सारं दुःख नाहींसं होईल. सर्व धर्मपुरुषांनीं हें ओळखलं. देवावर श्रद्धा असेल, माणसांबद्दल तुम्हांला प्रेम वाटत असेल तर तुम्ही सांठा करणारच नाहीं. 'दुसऱ्याचं धन घेऊं नको.' हें वचन हजारों वर्षांचं जुनं आहे. चमत्कार पहा, येशू, महंमद पैगंबर, तुकाराम महाराज सर्वजण सारखाच दाखला देतात.

"महंमद पैगंबर सांगतो, 'तुम्ही जर सर्व भार ईश्वरावर टाकला तर तो तुमची काळजी वाहील. पक्षी सकाळीं भुकेले बाहेर पडतात, संध्याकाळीं तृप्त होऊन घरट्याकडे परततात. तसेंच तुमचें होईल.' तुम्हांला येशूचं अगदीं असंच सांगणं. तो म्हणे 'आकाशांतील पाखरांकडे पहा, तीं पेरीत नाहींत तरीहि आपला प्रभु त्यांना चारा तयार करून ठेवतोच ना?' आतां तुकोबाचें वचन तर तुम्ही सर्व मनांत गुणगुणूं लागाल. 'पक्षी अजगर न करी संचीत। तयासी अनंत प्रतिपाळी ॥' किती सारखे विचार आहेत पहा! किती थोर! आज हेच विचार आम्हांला सांगून बापूजी गेले. त्यांचेच वारस विनोबा तरी दुसरें काय सांगत आहेत! संचय हा अनर्थाचं मूळ आहे. आपल्याजवळ जें जास्त आहे त्यांतलें दुसऱ्याला देऊन टाका. जगाचे बिकट प्रश्न हां हां म्हणतां सुटतील.

" मित्रांनो, आणखी एक प्रश्न, महत्त्वाची गोष्ट मी तुमच्या पुढें मांडणार आहे. जगांतला कुठलाहि धर्म घ्या, त्यांत आपल्या मनावर विजय मिळवणं हाच मुख्य विषय सांगितला आहे. आपलं मन हें ओढाळ जनावरासारखं इकडे तिकडे धावत असत. शत्रु आपणच असतों. आपणांला अधाशासारखा पैसा हवा असतो, सत्ता पाहिजे असते. आपल्या इतर वासना जोर करतात. म्हणून



आपण आपणांला जिंकलं पाहिजे. महंमद म्हणे, 'आपल्याला जिंकण्यासारखं श्रेष्ठ धर्मयुद्ध दुसरं नाहीं.' म्हणजे आपल्या वासनांना ताब्यांत आणणं हीच धर्मासाठीं केलेली सर्वांत थोर लढाई. आपल्या मनाचे लगाम ताब्यांत पाहिजेत ! या उपदेशांत तुम्हांला कुठेंहि फरक दिसणार नाहीं. मन प्रसन्न पाहिजे. त्यासाठीं शरिरावर जय मिळवला पाहिजे. हेंच श्रीकृष्ण, बुद्ध, महंमद, महावीर, नानक सर्वांनीं सांगितलं आहे. "

नाना सारखे बोलत होते. लोक तल्लीनतेनें ऐकत होते. एकामागून एक दाखले, संतवचनांची नुसती खैरात. नानांचें भाषण म्हणजे गंगेचा शुद्ध प्रवाह ! शेवटीं रात्र होऊं लागली. तेव्हां नानांनीं भाषण आवरतें घेतलें. ते म्हणाले, " आपण सर्व एकाच ईश्वराचीं लेकरें आहोंत हें ध्यानांत घ्या. म्हणजे दुसऱ्याचा



द्वेष तुम्ही करणार नाहीं. नदी जेथून निघते तेथें ती स्वच्छ असते, निर्मळ असते. पुढें. आपण माणसें तिचा प्रवाह गढूळ करतों. सर्व धर्म मुळांत शुद्ध होते. पण माणसांनीं त्यांत भेद पाडले. आपण ते आतां काढून टाकले पाहिजेत. गांवाच्या जवळची नदी तुंबलेली किंवा शेवाळलेली असली तरी पावसाळा येतांच ती स्वच्छ होते. दुथडी भरून ती वाहूं मात्र लागली पाहिजे. तसे प्रेमाच्या पुरांत सारे भेदाभेद, केरकचरा, शेवाळें वाहून जाऊं द्या. हा मुसलमान, तो ख्रिस्ती, अमका पारशी, तमका जैन असला क्षुद्र भाव सोडून द्या. आपल्या भारतात आपण सर्वांना सारखे लेखूं आणि भांडकुदळ जगाला धडा घालून देऊं. आपल्या सभेचा शेवट माझ्या साध्या शब्दांनीं करण्यापेक्षां ज्ञानेश्वर माउलीच्या पसायदानानें करूं या. साऱ्या धर्मांनीं हेंच स्वप्न रंगवलें आहे. ”

सारी सभा शांत बसली होती. नानाहि थांबले.



बुवांनीं साध्या गंभीर सुरांत म्हटलें—

जें खळांची व्यंकटी सांडो
तया सत्कर्मीं रति वाढो
भूतां परस्परें जडो
मैत्र जीवांचें
दुरितांचें तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्यें पाहो
जो जें वांछील तो तें लाहो
प्राणिजात.

नाना खालीं बसले. त्यांचा चेहरा थकलेला पण आनंदी दिसत होता. त्यांना एक प्रकारचें समाधान वाटत होतें. माणसें तर अगदीं वेड्यागत पहात राहिलीं. भाषण संपल्याचेंहि त्यांना भान राहिलें नाहीं. आभार झाले आणि राष्ट्रगीत सुरू झालें. तेव्हां कुठें माणसें भानावर आलीं.

तीं घरोघर चाललीं. कुणी नानांच्या पायाला हात लावण्याचा प्रयत्न करी. पण नाना त्यांना तसें करूं देत नसत. रायबा बरोबरच होता, इतक्यांत गर्दींतून वाट काढीत रहिमान दोनचार मंडळीसह पुढें येतांना दिसला, रायबा एकदम ओरडला, “ कोण ? कान्होबा, मी स्वप्नांत तर नाहीं ? ”

“ होय दादा, तोच मी.”

कान्होबानें भावाला मिठी मारली ! ती भरत भेट होती. सर्वांना गहिवर आला नंतर रायबा म्हणाला,

“ कान्होबा, तूं त्या आगींतून आलास कसा ? ” कान्होबानें बरोबरच्या माणसाला पुढें केलें आणि म्हटलें, “ दादा, या अबदुलनं माझे प्राण वांचविले, नाहींतर आपली भेट स्वर्गांतच व्हायची.

रहिमानचा हा लांबचा भाऊ. यानं जीव धोक्यांत घालून मला इथवर आणलं."

रायबा म्हणाला, "अबदुल, तुझे उपकार कसे फेडूं? हा जिवाचा कलिजा तूं परत दिलास."

अबदुल म्हणाला, "यांत उपकार कसले? मित्राचं काम मी केलं."

सर्व मंडळी रायबाच्या घराकडे निघालीं. नानांनीं केलेला उपदेश प्रत्यक्ष कृतींत उतरलेला दिसला. सर्वच आनंदित झाले होते. रायबाकडे मोठी पंगत झाली. कौतिकनें आपला सारा सुग्रण-पणा आज दाखवला होता.

• • •

अनुक्रम ७९६२० विभाग बा.वा. ६७३ २९.३.७९

## नवा प्रकाश

रहमानचें डोकें ठिकाणावर आलें. त्यानें दंगा करण्याची भाषा सोडून दिली. नानांच्या व्याख्यानाचा परिणाम झाला होता त्याच्यावर. त्याचप्रमाणें अबदुल–कान्होबा जोडीनेंहि त्याला बरेंच ताळ्यावर आणलें. आतां श्री गजानन आणि डोले निर्विघ्नपणें पार पडणार असें वाटूं लागलें.

तरी पण नानांनीं तोंवर गांवांतच राहावें असा गांवकऱ्यांचा आग्रह पडला. न जाणों कुठें ठिणगी पडली तर भडका उडायचा. नानांनीं इतर ठिकाणचे कार्यक्रम रद्द केले आणि ते त्या गांवीं राहिले. मशिदीसमोरच्या गणपतीची स्थापना त्यांनीं स्वतः केली. आरती आणि नमाज यांच्या वेळा एक न याव्यात एवढेंच त्यांनीं सांगितलें. दररोज सांजसकाळ नाना तेथें हजेरी देत.

मिरवणुकी शांतपणें पार पडल्या. दगाफटका झाला नाहीं. मात्र ही शांतता आणि एकी कायमची टिकली पाहिजे असें नाना सांगत. ते हें सांगूनच थांबले नाहींत. जायच्या दिवशीं त्यांनीं गांवांतल्या मुख्य धर्मांच्या पुढाऱ्यांची सभा बोलावली. सालेभाई, रिषभदास, पिंटो, मोरशास्त्री असे अनेकजण होते. रायबा, रहमान आणि त्यांचा परिवार तर होताच.

सर्वजण आल्यावर नानांनीं बोलण्यास सुरवात केली. “ मित्रांनो, यावेळीं तुमच्या या गांवीं एकी दिसली ती कायम ठेवली पाहिजे. नदीला आपण धरण घालतो कीं नाहीं ? कशा-करितां ? तर बारमहा पाणी पुरावं म्हणून. होय ना ? मग आज

गांवांत जी शांतता अन् एकी झाली ती कायम ठेवली पाहिजे. केवळ हिंदु-मुसलमान किंवा हिंदु—ख्रिस्ती एवढाच तेढीचा विषय नाहीं. हिंदूत अनेक पंथ आहेत. जाती आहेत. उच्च समजणाऱ्या जाती खालच्या जातींना जनावरांसारखं वागवतात. हें चूक आहे. द्वेष धुमसत राहतो यामुळें. सर्वांनीं एकमेकांशीं प्रेमानें वागलं पाहिजे."

मोरशास्त्री पगडी सावरीत पुढें सरसावले. ते म्हणाले, "तसाच कांहीं प्रसंग असला तर भांडणं होणार. एऱ्हवीं गांवांत बखेडा नसतोच कधीं."

नानांनीं हसून उत्तर दिलें, "तहान लागल्यावर विहीर खणून काय उपयोग! मी असं म्हणतो, तसला कांहीं प्रसंग आला तरी बखेडा माजतां कामां नये. त्यासाठीं आपण सतत तयारी करीत असलं पाहिजे. माणसं झगड्यासाठीं तयारी करतील. कवाईत करतील, शस्त्र गोळा करीत राहतील. पण शांततेसाठीं कांहीं करणार नाहींत."

सालेभाई मध्येंच बोलले, "नानाजी, आपलं म्हणणं रास्त आहे. पण शांततेसाठीं तयारी ती काय करायची? आमचा तर भेजा कांहीं चालत नाहीं. आपणच सांगा."

"सालेभाई, असं पहा. दोन गोष्टी व्हायला पाहिजेत. एक आपल्या अज्ञानाचा नाश झाला पाहिजे. तुम्हांला हिंदुधर्माचीं तत्त्वें कळलीं किंवा रायबा-मोरशास्त्र्यांना कुराणशरीफ समजलं तर तुमच्यातली बरीच तेढ नाहींशी होईल. म्हणून आपण एक 'सर्वधर्म-मंडळ' स्थापन करूं. आज इथें जमलेले आपण सारेजण त्या मंडळाचे सभासद."

"काय काम करायचं त्या मंडळानं?" रिषभदासांनीं विचारलें.

" निरनिराळ्या धर्मांवर व्याख्यानं करावीं. मात्र त्यांत हीन मिसळायचें नाहीं. मूळ पुरुषाचा शुद्ध उपदेश तेवढाच सांगायचा. इतरांनीं तो ऐकावा. एक दिवस पिंटोसाहेब ख्रिस्ताची शिकवण सांगतील. एकाद्या दिवशीं मोरशास्त्री हिंदुधर्माचें रहस्य समजावून देतील. कधीं सालेभाई कुराण स्पष्ट करतील. हळूं हळूं तुम्हांला असं कळून येईल कीं, आपण उगीच तेढ धरतों, सर्व धर्मांची मूळ शिकवण सारखीच आहे."

नाना जरा थांबले आणि पुन बोलूं लागले, " पण एकादी गोष्ट नुसती बुद्धीला पटून भागत नाहीं. नुसतें पुस्तकी ज्ञान वांझोटं असतें. तें ज्ञान तुमच्या आचारांत उतरलें पाहिजे. तुम्ही त्याप्रमाणें वागलं पाहिजे."

" म्हणजे काय ? आम्ही नमाज पढायचा आणि या सालेभाईंनीं अन् पिंटोसाहेबांनीं सोवळं नेसून देवाला अभिषेक करायचा?" मोरशास्त्र्यांनीं कुत्सितपणें विचारलें. नानासारख्यांना सुद्धां आपण आडवलें कीं नाहीं असा चेहरा करून ते मंडळींकडे पाहूं लागले.

नाना रागावले नाहींत. शांतपणानें ते म्हणाले, " मोरशास्त्री, दुसऱ्या धर्माबद्दल आदर बाळगणं म्हणजे तो धर्म पत्करणं नव्हे. तुमच्यासारख्यांनीं असा विपरीत अर्थ करावा ही खेदाची गोष्ट आहे. आपल्या सरकारचं धर्माच्या बाबतींतलं धोरण फार उदार आहे. तुम्ही ख्रिस्ती असा, मुसलमान असा, माळकरी असा, शास्त्री असा. तुम्हांला आपल्या मताप्रमाणें उपासना करायचा पूर्ण हक्क आहे. तुमच्यावर सक्ती कसलीच नाहीं. पण आपली उपासना न लादतांहि दुसऱ्याला आपल्या धर्माबद्दल प्रेम वाटेल असं करणें शक्य नाहीं का ?"

" कसं ? सांगा ना."


" तुमच्याकडे सत्यनारायण आहे. त्याची पूजा करायला

या रहमानला बोलवा असं मी सांगणार नाहीं. कुणीच शहाणा माणूस असल्या गोष्टीचा आग्रह धरणार नाहीं. पण तुमच्या घरच्या बाहेरच्या दिवाणखान्यांत बसून रहमाननं सत्यनारायणाची कथा ऐकायला काय हरकत आहे ? सर्व धर्म माणसाला सत्याकडेच नेणारे आहेत ना ? रहमाननं किंवा पिंटोसाहेबांनीं सत्यनारायणाची कथा ऐकली तर देव का विटाळणार आहे ? तसंच सालेभाईंनींसुद्धां ईदच्या दिवशीं आपल्या हिंदु, ख्रिस्ती, पारशी मित्रांना पान-सुपारीला बोलवावं. फार थाट करायचं कारण नाहीं. नुसतं सुपारीचं खांड अन् सलाम पुरे होईल. पिंटो साहेब तोच समारंभ नाताळांत करतील. सर्वजण जातील. अशी ये जा असली म्हणजे परस्परां-तल्या प्रेमाचे धागे बळकट होत जातात. स्वधर्मांतल्या पंथांनीं व जातींनींसुद्धां असं दळणवळण ठेवलं पाहिजे. हिंदूंत अठरापगड जाती आहेत; नाना पंथ आहेत; त्यांनीं नेहमीं आपल्या उत्सवांना, समारंभांना इतरांना आदरानं बोलवावं. शांततेची तयारी मी म्हणतों ती हीच."

या ठिकाणीं नाना थांबले. लोकांना वाटलें सांगणें संपलें. पण नानांना आणखी कांहीं बोलायचें होतें. त्या बोलण्याची नाना मनांत जुळवाजुळव करीत होते. त्यांचा चेहरा जरा गंभीर झाला. मग सावकाशपणें ते सांगूं लागले, " मित्रहो, आणखी एका नाजुक गोष्टीचा उल्लेख करून मी माझं सांगणं संपवितों. वैद्य आपणांला औषध देतो, तसंच पथ्यहि सांगतो. अमुक खाऊं नका, तमुक पदार्थ वर्ज्य करा, अशा सूचना तो देतो. तसं आपण वागलों म्हणजेच रोग आटोक्यांत येतो. तसं एक मोठं पथ्य मी तुम्हांला सांगणार आहें. दुसऱ्या धर्माच्या किंवा पंथाच्या लोकांच्या भावना ओळखा आणि त्यांना मान द्यायला शिका तसें आपण करीत नाहीं म्हणून तंग वातावरण होतें. पहा, आपण मिरवणूक मशिदीवरून नेतांना थोडा-

वेळ वाद्यं थांबविलीं तर कुठं बिघडलं ? आपल्या मुसलमान बांधवांची तेवढीच डोकेदुखी आहे ना ? सांभाळावी आपण ती. पण मुसलमानांनींहि असं लक्षांत घ्यावं कीं, हिंदु आपले मोठे भाऊ, त्यांना गोमाता पूज्य. आपण ती कापली तर त्यांना दुःख होतें, संताप येतो. असली रीत सोडून द्यावी. मुसलमानांनीं गोमाता कापली नाहीं तर अल्ला मेहेरबानी करणार नाहीं असं थोडंच आहे ! शिवाजी महाराज फकीरांना दानं देत, मशिदींचीं वतनं त्यांनीं चालू ठेवलीं. थोर अकबरानं हिंदु पंडितांचा सन्मान केला. गांधीजींनीं ख्रिस्त जयंतीसाठीं सत्याग्रह बंद ठेवला. शिवाजी, अकबर, गांधीजी असलीं थोर थोर माणसं आमच्या देशांत झालीं. त्यांचं उदाहरण आम्ही गिरवलं नाहीं तर कसले आम्ही भारतीय ! आलं ना लक्षांत काय सांगतों तें, बाबांनो !

आतां तरी पुढें । हाचि घ्यावा बोध ।
आपसांत युद्ध । करूं नका ॥
सूर्य, चंद्र, तसा । एकचि देव रे ।
आपण लेकरें । त्याचीं सारीं ॥



अखिल धर्मांचा । एकचि प्रवाह ।
यािवशीं संदेह । धरूं नका ॥
आपली करावी । मनोभावें पूजा ।
आणि धर्म दूजा । आदरावा ॥
नाथ म्हणे येणें । आनंद फुलून ।
होईल नंदन । जगताचें ॥

याहून जास्त मला काहीं सांगायचें नाहीं."

नानांचा उपदेश साऱ्यांना पटला. त्या ठिकाणहून माणसें घरीं जातांना नवा हुरूप घेऊन गेलीं. नवा प्रकाश त्यांच्या डोळ्यांत पडला. आणि त्या गांवांत धर्मावरून किंवा जातीवरून दंगा व्हायची भीति मुळींच उरली नाहीं.

• • •

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि

IRBK-0105416